# वसई - विरार शहर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा

ठराव क्र. दिनांक. २५/०२/२०१६

प्रस्तावाचा विषय:- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेचे वृक्षप्राधिकरण, कर्जनिधी व विशेष योजनेसह अ व क अंदाजपत्रकाचे सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-१७ चे मुळ अंर्थसंकल्पीय अंदाज मा. स्थायी समितीने विचारात घेऊन निर्णय घेणे.

प्रस्तावाचा मजकुर :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९६ मधील तरतुदीप्रमाणे सविस्तर विचार विमर्ष करुन मा. स्थायी समितीने सन २०१५-१६ च्या सुधारीत अर्थसंकल्पासह सन २०१६-१७ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणेसाठी, पी बजेट चे अंदाज, जेंण्डर बजेटचे अंदाज व अंध अपंग कल्याण योजनांचे अंदाज यासह सर्वसाधारण 'अ' अर्थसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी / स्मार्ट सिटी / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबत आयुक्त यांनी सादर केलेली तपशिलवार माहिती, अंदाज व प्रस्ताव विचारात घेण्यास शिफारस केली आहे.

निर्णय :- पी बजेट, जेंण्डर बजेट व अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी / स्मार्ट सिटी / विशेष निधी योजना अर्थसंकल्प याबाबतचे सन २०१५-१६ चे सुधारीत अंदाज व सन २०१६-१७ चा मुळ अंदाज तयार करताना मा.स्थायी समितीने दि. २५/०२/२०१६ ते दि. २९/०२/२०१६ या कालावधीत सविस्तर चर्चा व विचार विमर्ष करुन खालीलप्रमाणे फेरबदलासह शिफारशी केल्या आहेत.

१) सर्व मालमत्तांना कर आकारणी करणे तसेच अनधिकृत मालमत्तांसंदर्भाने शास्ती आकारणी करणेकामी ठोस उपाययोजना करणेचे निर्देश देणेत आले.

२) पी बजेट व महिला बाल कल्याण समितीच्या अर्थसंकल्पातील तरतुदीमधून अधिक - अधिक लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा यासाठी आवश्यक ती प्रसिध्दी देऊन अधिक - अधिक निधीचा योग्य विनियोग करणेचे निर्देश देणेत आले.

३) सत्कार व उत्सव समारंभाच्या कार्यक्रमाच्या तरतुदीमधून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणेकामी आवश्यक कार्यवाही करणेचे निर्देश देणेत आले.

४) पर्यटन विकासासाठी सल्लागार नेमून विकासाची कार्यवाही करावी ज्यायोगे भविष्यात उत्पन्नाचा एक कायमस्वरुपी स्त्रोत देखील निर्माण होईल.

५) सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अंशदान या शिर्षाऐवजी राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (NULM) करणेत आले.

६) अर्थसंकल्प पृष्ठ क्र. ११४ वरील प्रत्यक्ष रकमा २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील ०.०० खर्च ऐवजी सदर खर्चाचा समावेश ५% महिला बाल कल्याण कार्यक्रमाच्या इतर योजना व कार्यक्रम या शिर्षामध्ये त्याच पृष्ठावरील अ.क्र. २ मधील रकमेमध्ये व अर्थसंकल्प पृष्ठ क्र. ११५ वरील प्रत्यक्ष रकमा २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मधील ०.०० खर्च ऐवजी सदर खर्चाचा समावेश ५% महिला बाल कल्याण कार्यक्रमाच्या इतर योजना व कार्यक्रम या शिर्षामध्ये पृष्ठ क्र. ११४ अ.क्र. २ मधील रकमेमध्ये आहे अशी दुरुस्ती करणेत आली.

७) आपत्कालीन व्यवस्थेसाठीची सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. १ कोटी इतकी करणेत आली.

८) दिवाबत्ती विभाग पोल स्थलांतर / सर्किट लाईट व्यवस्था सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. ३ कोटी इतकी करणेत आली.

९) इतर दिवाबत्ती व्यवस्था तरतुद सन २०१६-१७ ची तरतुद रु. २५ लक्ष ऐवजी रु. २ कोटी ७५ लक्ष इतकी करणेत आली.

१०) विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/ केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था सन २०१६-१७ ची तरतुद रु. २५ लक्ष ऐवजी रु. २ कोटी ७५ लक्ष करणेत आली.

११) सिग्नल व्यवस्था सन २०१६-१७ ची तरतूद रु. ८ कोटी ने कमी करुन रु. ३ कोटी इतकी करणेत आली.

१२) सामान्य प्रशासन संगणक चालक / संकणकीय व्यवस्थापन ठेका सन २०१५-१६ ची तरतुद रु. ७ कोटी ३ लक्ष ३ हजार ऐवजी ७ कोटी ५४ लक्ष करणेत आली.

१३) सार्वजनिक उद्याने व क्रिडांगण संकिर्ण सन २०१५-१६ ची तरतुद रु. ५० हजार ऐवजी २ लक्ष करणेत आली.

१४) घनकचरा व्यवथापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाणे इ. साफसफाईसाठी घंटा गाडी, यांत्रीक झाडू उपलब्ध करणेसह सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले सफाई सन २०१५-१६ ची तरतुद रु. १२० कोटी ३२ लक्ष ऐवजी रु. ११९ कोटी ७९ लक्ष ५३ हजार करणेत आली.

१५) कुष्टरोग बाधीत पुरुष रुग्णांना कुष्टरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत उपचार व पोषण भत्ता सन २०१६-१७ ची तरतुद १० लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

१६) एच. आय. व्ही. बाधीत कुटुंबास उदरनिर्वाह व उपचारासाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत अर्थसहाय्य सन २०१६-१७ ची तरतुद रु. १० लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

१७) महिला बाल कल्याण समितीमार्फत कॅन्सरग्रस्तांसाठी सहाय्य सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. २५ लक्ष करणेत आली.

१८) अंध, अपंग, गतिमंदाकरिता कल्याणकारी योजना व योजना राबवणाऱ्या संस्थांसाठी अनुदान सन २०१६-१७ ची तरतुद रु. ७५ लक्ष ऐवजी रु. ५५ लक्ष करणेत आली.

१९) गतिमंद मतिमंद मुलांसाठी महिला बाल कल्याण समितीमार्फत वितरीत करावयाचे अनुदान (३% अंध, अपंग कल्याण तरतुद) सन २०१६-१७ ची तरतुद रु. ७० लक्ष ऐवजी ९० लक्ष करणेत आली.

२०) महिला डायलेसिस उपचार (५% म.बा.क) सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. ८० लक्ष करणेत आली.

२१) वधुपक्षास सामुदायिक विवाहासाठी अनुदान (५% म.बा.क) सन २०१६-१७ ची तरतुद रु. २० लक्ष ऐवजी रु. १० लक्ष करणेत आली.

२२) विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना (५% म.बा.क) सन २०१६-१७ ची तरतुद रु. १० लक्ष ऐवजी रु. १ कोटी ५१ लक्ष करणेत आली.

२३) कुष्टरोग बाधीत निराधार महिला व मुलींना महिला बाल कल्याण कार्यक्रमांतर्गत उपचार व पोषण भत्ता सन २०१६-१७ ची तरतुद रु. १५ लक्ष ऐवजी रु. १० लक्ष करणेत आली.

२४) निराधार मुलींना महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत विवाहासाठी अर्थसहाय्य सन २०१६-१७ ची तरतुद रु. १० लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

२५) एक मुलगीच असताना कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली असता अनुदान सन २०१६-१७ ची तरतुद रु. १५ लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

२६) नवजात रुग्ण बालकांस आवश्यक सुविधा पुरविणेसाठी अर्थसहाय्य सन २०१६-१७ ची तरतुद रु. १५ लक्ष ऐवजी रु. १० लक्ष करणेत आली.

२७) अंगणवाड्यांसाठी वाढीव भाडे सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. १० लक्ष करणेत आली.

२८) गर्भवती महिलांसाठी व प्रसुत महिलांसाठी रुग्णवाहिका खर्च सन २०१६-१७ ची तरतुद रु. २० लक्ष ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

२९) बालकांसाठी कार्य करणाऱ्या बाल भवन संस्थांसाठी अनुदान सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५० लक्ष ऐवजी रु. १० लक्ष करणेत आली.

३०) महीला व बालकल्याण योजना भांडवली कामे सन २०१६-१७ ची तरतुद रु. २६ लक्ष ७१ हजार ऐवजी २० लक्ष ७१ हजार करणेत आली.

३१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत सुर्या विस्तारित १०० द.ल.ली. पाणीपुरवठा योजना सन २०१५-१६ ची तरतुद रु. २५ कोटी ने कमी करुन सन २०१६-१७ मध्ये रु. २५ कोटी वाढ करणेत आली.

३२) टँकरद्धारे पाणीपुवठा सन २०१६-१७ ची तरतुद रु. ४५ लक्ष ऐवजी रु. ६० लक्ष करणेत आली.

३३) टी. सी. एल. पावडर व ॲलम खरेदी सन २०१६-१७ ची तरतुद रु. १३ लक्ष ऐवजी रु. ५० लक्ष करणेत आली.

३४) उसगाव योजना दुरुस्ती देखभाल सन २०१६-१७ ची तरतुद रु. २ कोटी ऐवजी रु. २ कोटी ७५ लक्ष करणेत आली.

३५)	उसगाव योजना क्लोरीनेशन व्यवस्था सन २०१६-१७ ची तरतुद रु. ८० लक्ष ऐवजी रु. १ कोटी २० लक्ष करणेत आली.

३६)	सुर्या योजना दुरुस्ती देखभाल सन २०१६-१७ ची तरतुद रु. १ कोटी ६२ लक्ष ऐवजी रु. ४ कोटी करणेत आली.

३७)	पाणीपुरवठा भाडे तत्वावरील वाहन भाडे सन २०१६-१७ ची तरतुद रु. ६५ लक्ष ३४ हजार ऐवजी ३० लक्ष करणेत आली.

३८)	नवीन मोटार पंप बसविणे व देखभाल दुरुस्ती सन २०१६-१७ ची तरतुद रु. ४० लक्ष ऐवजी रु. ६० लक्ष करणेत आली.

३९)	बोअरवेल दुरुस्ती व दुरुस्तीसाठी साहित्य खरेदी सन २०१६-१७ ची तरतुद रु. ३० लक्ष ऐवजी रु. ५० लक्ष करणेत आली.

४०)	मासवण बंधारा बांधकाम सन २०१६-१७ ची तरतुद रु. १ कोटी ऐवजी रु. ५ लक्ष करणेत आली.

४१)	गटारे बांधणे सन २०१६-१७ ची तरतुद रु. १९ कोटी २४ लक्ष ऐवजी रु. ९ कोटी १९ लक्ष ३४ हजार करणेत आली.

४२)	विकास निधी अंतर्गत सूर्या योजना इतर भांडवली कामे सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५ लक्ष ऐवजी रु. १ कोटी करणेत आली.

४३)	विकास निधी अंतर्गत उसगाव योजना  भांडवली कामे सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५ लक्ष ऐवजी रु. १ कोटी करणेत आली.

४४)	विकास निधी मधुन पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहीनी व्यवस्था सन २०१६-१७ ची तरतुद रु. ५ कोटी ऐवजी रु. १० कोटी करणेत आली.

४५)	परिवहन उपक्रम भाडे तत्वावरील वाहन भाडे व प्रवास भत्ता ही दोन स्वतंत्र शिर्षे तयार करुन सन २०१६-१७ साठी परिवहन उपक्रम वाहन भाड्याकरीता रु. २० लक्ष प्रवास भत्याकरीता रु. ६ लक्ष इतकी तरतुद करणेत आली.

४६)	सन २०१५-१६ अखेर हाती घेतलेल्या, पुर्ण झालेल्या परंतु प्रदाने न झालेल्या व अपुर्ण राहीलेल्या भविष्यात पुर्ण होणाऱ्या कामांच्या देयकांची प्रदाने सन २०१६-१७ व त्यापुढील तरतुदीतून प्रथम प्राधान्याने भागऊन तद्नुसार पुढील वित्तीय वर्षाच्या तरतुदींचे नियोजन करणेस शिफारस करणेत आली.

४७)	विकास कामांसाठी निधीची कमतरता व आस्थापना खर्चाचे अनुज्ञेय मर्यादा विचारात घेऊन तद्नुसार उत्पन्न व खर्च नियंत्रीत करणेच्या दृष्टीने ठोस प्रयत्न करणेस शिफारस करणेत आली.

४८)	अर्थसंकल्पासोबत सादर केलेल्या सबसीडी अहवालासह इतर सहपत्र तसेच मा. स्थायी समितीने अंतीमत: मान्य करुन शिफारस केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा तपशिल अर्थसंकल्पाच्या प्रतीत नमुद करणेत आला असुन सदर अर्थसंकल्पाची प्रत हा या ठरावाचा भाग मानला जाईल.

उपरोक्त फेरफारासह मा. स्थायी समितीने तयार करुन मा. महासभेपुढे सादर करणेस शिफारस केलेल्या सन २०१५-१६ चे सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१६-१७ चे मुळ पी बजेट, जेंण्डर बजेट, अंध अपंग कल्याणाचे बजेटसह सर्वसाधारण 'अ' अथसंकल्प, जल मल प्रवाह निधी 'क' अर्थसंकल्प, वृक्ष प्राधिकरण अर्थसंकल्प, कर्ज निधी अर्थसंकल्प, सॅटेलाईट सिटी योजना / स्मार्ट सिटी योजना / विशेष निधी योजना अंदाजपत्रक या सर्वांचा एकत्रित अर्थसंकल्पीय गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

(₹ लाखात)

| लेखाशिर्ष | सुधारीत अर्थसंकल्प सन २०१५-१६ | मुळ अर्थसंकल्प सन २०१६-१७ |
|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | ३२७८३.७२ | २७०६७.३४ |
| **जमा रकमा** | १२४८३९.१३ | १६६७४५.६७ |
| **प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा रकमा** | **१५७६२२.८५** | **१९३८१३.०१** |
| वर्ग जमा रकमा | ३७५३०.६७ | ३०४६२.८४ |
| **खर्च रकमा** | १३०५५५.५१ | १८००२६.३४ |
| वर्ग खर्च रकमा | ३७५३०.६७ | ३०४६२.८४ |
| अखेर शिल्लक | २७०६७.३४ | १३७८६.६७ |

सुचकाचे नाव :- श्री.
व स्वाक्षरी :-

अनुमोदकाचे नाव :- श्री.
व स्वाक्षरी :-

अनुकुल संख्या :- प्रतिकुल संख्या :- तटस्थ संख्या:-

ठराव सर्वानुमते मंजूर

(नितीन राऊत)
सभापती तथा पिठासीन प्राधिकारी
स्थायी समिती
वसई विरार शहर महानगरपालिका